जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक ०४/०७/२०२३**

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

## लोणीकंद पोलीस स्टेशन येथे गुरुपौर्णिमे निमित्त शालेय विद्यार्थ्याला केली मदत

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर हद्दीतील विष्णुजी शेकोजी सातव, वाघोली येथील शाळेत पोलीस उपनिरीक्षक,राहुल कोळपे व पोलीस अंमलदार,रितेश काळे यांनी भेट दिली असता तेथील शाळेतील एका कार्यक्रमा दरम्यान शाळेतील एका चाणाक्ष हुषार विद्यार्थी याचे भाषण ऐकले.

त्याचे भाषणाने प्रभावित होवुन पोलीस उपनिरीक्षक,राहुल कोळपे यांनी त्याचा परखडपणा व हजरजबाबी पणा पाहुन शाळेतील प्राचार्य श्री.ओगले सर यांचेशी सदर विद्यार्थी बाबत चौकशी केली असता हा विद्यार्थी हुशार असुन,त्याची घरची परिस्थिती बेताची असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचे अंगावरील हातशिलाई केलेला गणवेश पाहुन पोलीस अंमलदार,रितेश काळे यांनी या विद्यार्थ्या बाबत आम्हास माहिती सांगितली.

तेव्हा आम्ही पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार असे मिळुन या विद्यार्थ्याला काहितरी मदत करण्याचे ठरले. आज गुरुपौर्णिमेचे औचित्य साधुन लोणीकंद पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले. त्याला शाळेचे नवीन ०२ गणवेश घेवुन दिले व त्याला काहि प्रमाणात रोख स्वरुपात मदत केली. यावर त्या विद्यार्थ्याने पोलीसांचे आभार व्यक्त करुन,या मदतीची मी भविष्यात मोठा अधिकारी होवुन परतफेड करीन असे मत व्यक्त केले.